**प्रेस नोट**

जळगांव जिल्हा पोलीस
दिनांक- 24/03/2026

प्रति,

सर्व संपादक,
दैनिक वृत्तपत्र,साप्ताहीक,
मासिक,फेसबुक लाईव्ह.

**विषय- दरोड्याच्या गुन्हयातील फरार आरोपीतास गावठी कट्टा सह अटक केलेबाबत**

दिनांक 23/03/2026 रोजी 16.00 ते 23.00 वाजेपावेतो मा.पोलीस अधिक्षक सो जळगांव यांचे आदेशान्वये नशिराबाद पोलीस स्टेशनचे हद्दीत कोंबिंग ऑपरेशन राबवित असतांना सपोनि योगिता नारखेडे यांना गुप्त माहीती मिळाली की नशिराबाद गावात बस स्टॅण्ड परीसरात **भुसावळ शहर पोलीस स्टेशन कडील गु.र.न** 288/2025 **भा.न्या.सं. कलम** 311,312 **सह शस्त्र अधिनियम कलम** 3/25 **प्रमाणे** दाखल गुन्हयातील फरार आरोपी नामे चेतन सुर्यभान पाटील हा कट्टा घेवुन दहशत माजवित फिरत आहे,त्यावरुन मा.सपोनि नारखेडे यांनी सफौ/1490 राजेश मेंढे, पोहेकॉ/2714 कमलाकर बागुल,पोकॉ/346 भरत बाविस्कर,पोकॉ/476 पंकज सोनवणे,पोकॉ/268 भुषण पाटील, पोकॉ/211 विजय अहिरे,अश्यांना सदर इसमावर कारवाई करणेबाबत आदेशित केल्याने त्यांनी सदर इसमावर अचानक छापा टाकुन त्यांस 20.20 वाजता जागीच पकडले. त्याचे ताब्यातुन एक लोखंडी चंदेरी रंगाचा काळ्या रंगाची प्लास्टीक ची मुठ असलेला गावठी कट्टा तसेच एक डमी गावठी कट्टा जप्त करुन आरोपी नामे चेतन सुर्यभान पाटील,वय-18,रा.वरची अळी ,नशिराबाद ता.जि.जळगांव यांस ताब्यात घेवुन त्याचे विरुध्द नशिराबाद पोलीस स्टेशन येथे गु.र.न.93/2026 शस्त्र अधिनियम कलम 3/25 प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढिल तपास पोहेकॉ/2096 प्रशांत विरणारे हे करीत आहेत.

सदर कारवाई मा.पोलीस अधीक्षक श्री.महेश्वर रेड्डी,अपर पोलीस अधीक्षक श्री.अशोक नखाते,उपविभागीय पोलीस अधिकारी भुसावळ भाग श्री.केदार बारबोले यांचे मार्गदर्शन व सुचनाप्रमाणे सहायक पोलीस निरिक्षक श्रीमती योगिता नारखेडे यांचे पथकातील अंमलदार सफौ/1490 राजेश मेंढे, पोहेकॉ/2714 कमलाकर बागुल,पोकॉ/346 भरत बाविस्कर,पोकॉ/476 पंकज सोनवणे,पोकॉ/268 भुषण पाटील, पोकॉ/211 विजय अहिरे अश्यांनी केली आहे.

जनसंपर्क अधिकारी
जळगांव जिल्हा पोलीस


महाराष्ट्र पोलीस
नशिराबाद पोलीस स्टेशन
जिल्हा - जळगाव
दुरध्वनी क्रमांक : ०२५७-२३५६३३३
Email : ps.nashirabad.jal@mahapolice.gov.in
नशिराबाद पोलीस स्टेशन